


माणदेशाच्या विकासावर दृष्टिक्षेप टाकणारे पुरोगामी विचारसरणीचे एकमेव दैनिक

# माणदूत एक्सप्रेस

स्थापना २००२

www.mandootexpress.com

email- mandootexpress5@gmail.com

संपादक–मोहन मस्के मो.९८५०४०३७७३

■ सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, आटपाडी, जत, सोलापूर, सांगली ■




वर्ष-२४ वे | अंक -८४ | पृष्ठे-४ | मूल्य - १ रुपये | सोमवार दि.१२ जानेवारी २०२६ | R.N.I. NO. MAHMAR/2002/10619




# सांगोला शहरातील मिरज रोडवरील भुयारी मार्ग दुरुस्तीसाठी बंद

## पहिल्याच दिवशी शहरात वाहनांची रांग






सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला शहरातील मिरज रोडवरील भुयारी मार्ग अखेर दुरुस्तीच्या कामासाठी काल रविवार दि.११ जानेवारीपासून बंद करण्यात आला. गेल्या अनेक दिवसांपासून या भुयारी मार्गाच्या खराब अवस्थेमुळे नागरिक व वाहनचालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत होती. अखेर रेल्वे प्रशासनाने दखल घेत भुयारी मार्गाच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले असून, हे काम पूर्ण होण्यासाठी किमान दोन महिने हा मार्ग बंद राहणार आहे.

भुयारी मार्गात पाणी साचणे, रस्ता उखडणे तसेच घसरुन पडणे, चिखल होणे अशा तक्रारी सातत्याने येत होत्या. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने हा मार्ग तातडीने बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुरुस्ती कालावधीत या मार्गावरून कोणत्याही प्रकारची वाहतूक होणार नाही. सांगोला शहरातील मिरज रोडवरील भुयारी मार्ग दुरुस्तीच्या कामासाठी बंद करण्यात आल्याने शहरात वाहनांची मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून आली. किमान २ महिने हा मार्ग बंद राहणार असल्याने पहिल्याच दिवशी शहरात वाहनांची रांग लागली असून, वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली होती.

भुयारी मार्ग बंद असल्याने सांगोला शहरात वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झाला आहे. विशेषतः अवजड व मोठ्या वाहनांमुळे अंतर्गत रस्त्यांवर प्रचंड गर्दी झाल्याचे चित्र दिसून आले.. त्यामुळे दैनंदिन वाहतूक विस्कळीत होत असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.शहरात मोठ्या वाहनांचा प्रवेश तातडीने रोखावा, त्यासाठी पर्यायी मार्ग निश्चित करावेत तसेच योग्य ठिकाणी वाहतूक पोलीस तैनात करून नियोजन लावावे, अशी ठाम मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, मिरज रोडकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी व नागरिकांनी शहरातील पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर भुयारी मार्ग पूर्ववत सुरू करण्यात येणार आहे.

**मिरज रोडवरील भुयारी मार्ग दुरुस्तीसाठी बंद करण्यात आल्याने पर्यायी मार्गांवर वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. सातत्याने ये–जा करणाऱ्या वाहनांमुळे रस्त्यावर प्रचंड धूळ उडत असून, त्याचा मोठा त्रास व्यापारी व नागरिकांना सहन करावा लागत आहे. दरम्यान, पर्यायी मार्गांवर नियमित पाणी फवारणी करणे, धूळ नियंत्रणासाठी उपाययोजना करणे तसेच वाहतुकीचे योग्य नियोजन लावणे, अशी मागणी व्यापारी व नागरिकांकडून होत आहे.**

# सांगोला रोटरी क्लबतर्फे उत्कर्ष विद्यालयात 'रायला' कार्यक्रम उत्साहात संपन्न

## सातवी ते नववीच्या ३०० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला रोटरी क्लबच्या वतीने शनिवारी सांगोला येथील उत्कर्ष विद्यालयात 'रायला' हा व्यक्तिमत्त्व विकास व नेतृत्वगुण प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. रायला कार्यक्रमात इयत्ता सातवी ते नववी मधील सुमारे ३०० विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, सकारात्मक विचारसरणी, नेतृत्वगुण, संघभावना व निर्णयक्षमता विकसित करणे यावर भर देण्यात आला. विविध प्रेरणादायी संवाद, मार्गदर्शन सत्रे व उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमतेची ओळख करून देण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उत्कर्ष विद्यालयाचे प्राचार्य सुनील कुलकर्णी यांनी मोलाचे सहकार्य केले.

रायला कार्यक्रमाचे आयोजन व मार्गदर्शनासाठी प्राचार्य साजीकराव पाटील, इंजि मधुकर कांबळे, इंजि संतोष भोसले, डॉक्टर अनिल कांबळे, महेश गवळी, इंजि संतोष गुळमिरे, इंजि विकास देशपांडे, दीपक चोथे, अरविंद डोंबे, प्रा. राजेंद्र ठोंबरे, रोटरी क्लब सांगोलाचे अध्यक्ष श्रीपती आदलिंगे तसेच विजय म्हेत्रे यांनी विशेष परिश्रम घेतले.

शेवटी सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली. रोटरी क्लब सांगोला यांच्यातर्फे भविष्यातही अशा शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# जवळा येथील परवीन इनामदार यांचे निधन



जवळा: जवळा येथील सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी कै. ऐनुद्दीन इनामदार यांच्या पत्नी परवीन इनामदार यांचे अल्पशा आजाराने रविवार दि.११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी निधन झाले.

त्यांच्या पश्चात ४ मुले व मुली आहेत. त्या सुभेदार मेजर बिलाल इनामदार, जिलाणी, जाहिद आणि जुबेर इनामदार यांच्या मातोश्री आणि ग्रामसेवक सिकंदर इनामदार आणि गफार इनामदार, गोवा यांच्या चुलती होत्या.

त्यांचा दफनविधी जवळा येथील इनामदार कब्रस्तान येथे रविवारी सायंकाळी ६ वाजता झाला. त्यांच्या तिसऱ्या दिवसाचा विधी उद्या मंगळवार दिनांक १३ जानेवारी रोजी सकाळी होणार असल्याचे त्यांचे नातेवाईकांनी सांगितले.

# देवळे येथील सौ.द्रौपदी माळी यांचे निधन



सांगोला (प्रतिनिधी): सांगोला तालुक्यातील देवळे येथील सौ.द्रौपदी सुखदेव माळी यांचे शुक्रवार दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४.५० वाजता सांगोला येथील राहते घरी वृद्धापकाळाने निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ८२ होते.

त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

अलिबाग येथील सेवानिवृत्त उप अभियंता श्री रावसाहेब माळी व सांगोला तालुक्यातील अकोला येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात कार्यरत असलेले पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.मोहन माळी यांच्या त्या मातोश्री होत.

# लाडक्या बहिणींना सर्वात मोठा दिलासा, योजनेबाबत सरकारचा मोठा निर्णय

मुंबई:- लाडकी बहीण योजनेसाठी सरकारने केवासयी सक्तीची केली होती, ज्या महिलांनी केवायसी केली नाही त्यांचं नाव या योजेनेतून वगळण्यात येणार आहे. या योजनेसाठी केवायसी करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ होती, त्यानंतर आता ही साईट देखील बंद झाली आहे. परंतु तरी देखील काही महिलांना अजूनही या योजनेसाठी केवायसी करता येणार आहे. ज्या महिलांना पती किंवा वडील नाहीत अशा महिलांना अजूनही केवायासी करता येणार असल्यानं त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे, अंगणवाडी सेविकांकडे जमा करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या आधारे ही केवायसीची प्रक्रिया सुरू आहे. जिल्हा महिला बालविकास अधिकारी हे त्यांच्या लॉगइनवरून केवायसी करत आहेत. त्यामुळे आता आशा लाभार्थी महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे. अजूनही राज्यातील तब्बल ४५ लाख महिलांची केवायसी बाकी आहे.

दरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार लाडक्या बहिणींना डिसेंबर आणि जानेवारीचे पैसे हे मकर संक्रांतीपूर्वी मिळणार आहेत, परंतु १५ जानेवारी रोजी राज्यात महापालिका निवडणुकीसाठी मतदान असल्यानं काँग्रेसकडून यावर आक्षेप घेण्यात आला होता. काँग्रेसनं या संदर्भात निवडणूक आयोगाला पत्र देखील पाठवलं आहे. त्यामुळे आता लाडक्या बहिणींना मकर संक्रांतीपूर्वी तीन हजार रुपये मिळणार का हे पहावं लागणार आहे.

# कडलास मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सांगलीचा सुशांत सरगर प्रथम



सांगोला (प्रतिनिधी):- ग्रामीण भागातील सुंदर कडलास अकोला रस्ता , गुलाबी थंडी आणि स्पर्धकांच्या अमाप उत्साहात कडलास मॅरेथॉन ची पाचवी आवृत्ती संपन्न झाली. कडलास मॅरेथॉनच्या पाचव्या स्पर्धेमध्ये पाचशेहून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला.

स्पर्धेची सुरुवात सांगोल्याच्या तहसीलदार बाळूताई भागवत मॅडम यांच्या हस्ते करण्यात आली. अध्यक्षस्थानी कडलाच्या माजी सरपंच अनुराधाताई पाटील या होत्या. यावेळी आपुलकी प्रतिष्ठानचे राजेंद्र यादव सर, सांगोला महाविद्यालयाचे पक्षी निरीक्षक प्रा .विधीन कांबळे सर व प्रा .प्रकाश बनसोडे सर तसेच सायकलिस्ट प्रा.संतोष कांबळे सर व धावपटू डॉ. शैलेश डोंबे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कडलास गावचे सुपुत्र कार्यकारी अभियंता सचिन पवार यांच्या संकल्पनेतून व प्रेरणेने झालेल्या या मॅरेथॉन स्पर्धेत खुल्या १० किमी गटांमध्ये प्रथम येत सांगलीच्या सुशांत प्रकाश सरगर याने ३२ मिनिटात स्पर्धा पूर्ण करून बाजी मारली. तर द्वितीय राहुल बाळासो सूर्यवंशी, जत व तृतीय अजित चंद्रकांत चौगुले ,वाडेगाव यांनी पटकावला. दहा किलोमीटर महिला गटामध्ये प्रथम अक्षरा शिवाजी पवार, बालाजी नगर, द्वितीय आरोही प्रदीप वाटमास, सोलापूर तर तृतीय साक्षी उत्तम भंडलकर महुद यांनी मिळवला.शालेय गट आठवी ते दहावी मुले प्रथम रविराज दत्तात्रय नरळे द्वितीय संकेत सचिन पोळ तर तृतीय प्रेम दशरथ डांगे यांनी मिळवला. मुलींमध्ये प्रथम श्रद्धा राजेंद्र पोळ, द्वितीय अनुश्री हरिदास मासाळ तृतीय राधिका सुरेश कोळवले.

तर तीन किलोमीटर पाचवी ते सातवी गटांमध्ये मुलांमध्ये प्रथम अजय पिंटू राठोड मंगळवेढा द्वितीय सार्थक नवनाथ खरात येळवी शौर्य गजानन लवटे महूद यांनी मिळवला .तर मुलींमध्ये प्रथम राजेश्वरी संभाजी किरगत द्वितीय अनुराधा प्रकाश देशमुख तृतीय आकर्ष शिवाजी पवार.विजेत्यांना रोख पारितोषिक, ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले.

तहसीलदार भागवत मॅडम कार्यक्रमात बोलताना म्हणाल्या की तुम्हाला आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर शरीर रुपी संपत्ती तुम्ही जपली पाहिजे. त्यासाठी धावणे, चालने ,सायकलींग ,योगा, जिम यापैकी कोणत्या ना कोणत्या ॲक्टिव्हिटी दररोज करत राहणे महत्त्वाचे आहे. सध्याच्या तरुण पिढीने मोबाईल लांब ठेवून मैदानावरती एक तास घालवणे काळाची गरज झाली आहे कडलास मॅरेथॉन ही ग्रामीण भागातील एक चांगली आरोग्यदायी चळवळ आहे. आणि त्यानिमित्ताने आपण नववर्ष साजरे करता ही आनंदाची गोष्ट असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक दिगंबर गायकवाड, राहुल पाटील, नितीन ठोकळे ,अतुल वाघमोडे, शहाजी चव्हाण ,मुकुंद पाटील, अनिल लिगाडे , संतोष जाधव अमोल लिगाडे, शिवाजी गायकवाड ,ज्योतीराम काटकर, लहू जगताप, दीपक अवताडे, शशिकांत ढेबे, सिद्धेश्वर ढेबे, मुन्ना माने यांनी परिश्रम घेतले.



# मुंबईचे काय होणार?...

आपल्या देशात कुणालाही कुठेही पोटभरण्याचा अधिकार घटनेने दिला आहे.त्यातच देशाची अखंडता आणि समता दडलेली आहे. पण आज तू आमच्या प्रांतात नको, तू तुझ्या प्रदेशात जा, अशी उघडपणे धमकी दिली जाते. देशातील मोठ्या शहरांचे नागरिकीकरण का वाढले. कारण तिथला उद्योग आणि व्यापार वाढला. रोजगारासाठी कुणीही अशा मोठ्या शहरांकडे धाव घेत असतो. मुंबईत येवून राहिलेल्या परप्रांतीयांविषयी नेहमीच ओरड होत असते. मुंबई हे देशातील सर्वाधिक बहुभाषक, बहुसांस्कृतिक आणि स्थलांतरितांनी घडवलेले महानगर आहे. गेल्या चार दशकांत हिंदी भाषकांची संख्या पाचपटीनं वाढली, स्थलांतरित हे शहरातील बहुसंख्य झाले. तरीही एक महत्वाची बाब लक्षात येते ती म्हणजे, गुजराती, पारशी, मारवाडी, दक्षिण भारतीय आणि इतर अमराठी समाजांनी व्यापलेली पालिका आज एक-तृतीयांश अमराठी नगरसेवकांवर येऊन ठेपली आहे, हे मुंबईच्या राजकारणाचे वास्तव आहे. २०१७ च्या बीएमसी निवडणुकांत अमराठी नगरसेवकांचे प्रमाण ३३ टक्क्यांवर आले, तर १९७० च्या दशकात ते सुमारे ४५ टक्के होते. विशेष म्हणजे याच काळात मराठी भाषकांचे प्रमाण १९७१ मधील ४१.९९ टक्क्यांवरून २०११ मध्ये ३५.४० टक्क्यांवर घसरल्याचा निष्कर्ष समोर आला आहे. सुरुवातीचा काळ जेव्हा पालिकेवर अमराठी समाजांचे वर्चस्व होते,तेव्हा स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काही दशकांत मुंबई महानगरपालिकेचें राजकारण शहराच्या वैश्विक ओळखीचे प्रतिबिंब होते. १९६६ मधील महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ अंतर्गत प्रभागरचना बदलल्यानंतर १९६८ मध्ये झालेल्या पहिल्या निवडणुकांनी आधुनिक बीएमसीची चौकट निश्चित केली. त्या काळात गुजराती, पारशी, मारवाडी, मुस्लिम, ख्रिश्चन आणि दक्षिण भारतीय समाज राजकारणात ठळकपणे अस्तित्व राखून होते. १९६० च्या दशकात मुंबईच्या लोकसंख्येत अमराठी समाज ५८ टक्के असताना, १९७० च्या दशकाच्या मध्यावर पालिकेतील सुमारे ४५ टक्के नगरसेवक अमराठी होते. १९८० नंतर शिवसेनेने मराठी मतदारांचा निष्ठावान गट तयार केला आणि स्थानिक पातळीवर मराठी नेतृत्व उभं केले. याचा थेट परिणाम म्हणजे अमराठी नगरसेवकांच्या संख्येत घट झाली, तीही अमराठी लोकसंख्या वाढत असतानाच. शिवसेनेचे वर्चस्व आणि नंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उदयामुळे अमराठी नगरसेवकांचा वाटा २०१२ मध्ये २८ टक्क्यांवर आला.२०१७ च्या बीएमसी निवडणुका अत्यंत चुरशीच्या ठरल्या. शिवसेना आणि भाजप यांची युती तुटल्यानंतर दोन्ही पक्ष स्वतंत्र लढले. शिवसेनेला ८४, तर भाजपला ८२ जागा मिळाल्या; भाजपची ही आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी होती. या निवडणुकांत अमराठी उमेदवारांनी अभूतपूर्व यश मिळवले. ७६ अमराठी नगरसेवक विजयी झाले, जे आतापर्यंतचे सर्वोच्च संख्याबळ आहे. त्यामुळे त्यांचे प्रमाण २०१२ मधील २८ टक्क्यांवरून ३३ टक्क्यांपर्यंत वाढले. हे यश मुख्यतः भाजपने स्थलांतरित आणि अमराठी मतदारांमध्ये केलेल्या संघटनामुळे शक्य झाले . केंद्रातील सत्तेमुळे भाजप स्थलांतरितांविषयी तुलनेनं अधिक अनुकूल भूमिका घेताना दिसतो. हिंदुत्वाचा मुद्दा पुढे आल्याने शिवसेनेचे पारंपरिक स्थलांतरविरोधी राजकारणही या काळात काहीसें मंदावले. आज मुंबईतील अमराठी, स्थलांतरित समाज राजकीयदृष्ट्या अधिक आत्मविश्वासाने प्रामुख्याने भाजपाच्या छत्राखाली संघटित होताना दिसतो आहे. भाजप या संघटितपणाचा लाभ उठवून मुंबई महापालिका जिंकण्याचा खटाटोप करत आहे.भाजपला रोखण्यासाठी उद्धव यांनी त्यांचे चुलत बंधू राज यांच्याशी युती केली.राजमुळे आपले जास्तीत जास्त उमेदवर निवडून येतील,अशी उद्धव यांना आशा आहे. गेल्या वर्षापासून पुन्हा एकदा मराठीच्या मुद्द्याने मूळ धरले आहे. उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि राज ठाकरे यांची मनसे आता एकत्र आली आहे. त्यामुळे आता होत असलेल्या निवडणुकीनंतर मतदारांनी कुणाच्या पारड्यात आपले मत टाकेल आणि मुंबईवर वर्चस्व कुणाचे असणार हा खरा प्रश्न आहे.शिवसेना जेव्हा एकसंघ होती म्हणजे राज अजून बाहेर पडलेले नव्हते तेव्हा राज यांनी परप्रांतीयांचा प्रश्न ऐरणीवर आणून आंदोलन सुरू केले.त्याअगोदर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी लुंगी हटाव,मुंबई बचाव हे आंदोलन हाती घेतले होते.तेव्हापासूनच अमराठी माणसे शिवसेनेपासून दुरावत गेली.दोन दिवसांपूर्वीचे उदाहरण देता येईल.राज यांनी पुन्हा अमराठी व्यक्तींविषयी बोलायला सुरूवात केलीय.उत्तर भारतात प्रसिद्ध असलेला छटपूजेचा सोहळा मुंबईतही साजरा केला जातो.तुमची छटपूजा तुमच्या घरात करा,आम्हाला तुमची ताकत दाखवू नका,अशा शब्दात राज यांनी परप्रांतियांना दिला आहे.त्यामुळे ऐन निवडणुकीत हा मुद्दा तापण्याची चिन्हे दिसत आहेत.हा इशारा देवून राज यांनी भाजपच्या हाती आयतेच कोलित दिले आहे.राज यांच्या या वक्तव्याचे मुंबईत पडसादही उमटत आहेत.भाजप प्रचारामध्ये हा मुद्दा मांडून अधिकाधिक व्होट बँक मजबूत करू पहात आहे.तेव्हा उद्धव-राज यांची युती मुंबईत प्रतिष्ठा राखणार काय किंवा भाजप-शिंदेसेना मुंबई जिंकून दाखवणार काय याचे उत्तर शुक्रवारी मिळेल.

माणदूत एक्सप्रेस हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक मोहन शंकर मस्के यांनी भास्कर प्रिटींग प्रेस प्रा.लि. रामदेव वेअर हाऊस, हैद्राबाद रोड, सोलापूर (महाराष्ट्र) येथे छापून १०३२/२ ब लोहार गल्ली, सांगोला ता.सांगोला जि.सोलापूर पि.नं.४१३३०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशीत केले.
माणदूत एक्सप्रेस
EMail: mandootexpress5@gmail.com
दै.माणदूत एक्सप्रेसमधील प्रसिध्द होणाऱ्या बातम्या, जाहीराती व लेखातील मजकूरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# रात्री उशीरा जेवल्याने काय त्रास होतो, डॉक्टरांनी दिली उपयुक्त माहिती



आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे रात्री उशीरा जेवणे आणि उशीरा जेवणे हे सार्वत्रिक बनले आहे. त्यामुळे अनेकांना विविध आजार जडतात,अनेक लोक रात्रीच्या वेळी जेवतात त्यामुळे उशीराच जेवतात. त्यामुळे हळूहळू त्याचा शरीरावर त्याचा परिणाम होत आहे. ज्याचा लागलीच नाही परंतू उशीराने का होईना प्रकृतीवर त्याचा परिणाम होतो.

रात्री उशीरा जेवल्याने शरीराचे संतुलन बिघडते आणि ब्लडशुगर सारखी समस्येचा धोका वाढू लागतो.याचा परिणाम डायबिटीजपर्यंतच मर्यादित राहत नाही तर सर्वसामान्यातही शुगरची लेव्हल प्रभावित होऊ शकते. यासाठी रात्री उशीरा जेवण्याच्या सवयीला हलक्यात घेऊ नये

रात्री उशीरा जेवणे आणि ब्लड शुगर यात मोठे नाते दिसून आले आहे. अनेक संशोधनात हे सिद्ध झाले आहे की यामुळे साखरेची पातळी प्रभावित होऊ शकते. याचे मुळ कारण या सवयीबाबत विशेष सर्तक रहाण्याचा सल्ला दिला जाते. चला तर पाहूयात रात्री उशीरा जेवल्याने शुगर लेव्हलवर काय परिणाम होतो. असे रात्रीच्या वेळी खाल्लेले जेवण रात्री लागलीच ऊर्जेत रुपांतरीत होऊ शकत नाही असे आरएमएल हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुभाष गिरी यांनी म्हटले आहे. त्यामुळे ब्लड शुगरचे प्रमाण वाढू शकते.

**रात्री उशीरा जेवल्याने कशी वाढू शकते शुगर लेव्हल?**

जर एखादी व्यक्ती रात्री उशीरा जेवत असेल तर त्यांच्या शरीराचा संतुलन योग्य प्रकारे करण्यास अडचण होऊ शकते. रात्रीच्या वेळी शरीराचे कामकाज दिवसाच्या तुलनेत हळूवार होत असते. त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते.

खासकरुन जास्त गोड खाल्ल्याने शुगरची पातळी वेगाने वरती जाते. अनेकदा याचा परिणाम सकाळीच्या फास्टींग शुगरवर देखील पाहायला मिळतो. सातत्याने रात्री उशीरा जेवल्याने तुमच्या शरीराची नैसर्गिक दिनचर्या बिघडू शकते.ज्यामुळे साखरेचे नियंत्रण राखणे कठीण होते. याच कारणामुळे डॉक्टर रात्रीचे उशीरा जेवण्यास नकार देत असतात.आणि झोपण्याआधी किमान दोन तास आधी तरी जेवावे.

**सामान्य लोकांसाठी देखील धोका**

नेहमची लोक असा विचार करतात की शुगर वाढण्याची समस्या केवळ डायबिटीज रुग्णांसाठीच असते., परंतू असे बिलकुल नाही. जे लोक संपूर्णत: आरोग्यदायी आहेत त्यांच्या देखील रात्री जेवल्याची सवय भविष्यातील समस्येचे कारण बनू शकते. बराच काळ असे केल्याने शरीरातील शुगर कंट्रोल सिस्टीम कमजोर होऊ शकते.

हळूहळू इन्सुलिनवर याचा परिणाम होत असतो. आणि ब्ड शुगर सामान्य पातळीपेक्षा वर जाऊ लागते. अनेक प्रकरणात ही सवय पुढे जाऊन डायबिटीजचा वाढवू शकते. यासाठी सामान्य लोकांसाठी देखील वेळेवर जेवणे आणि सुंतलित आहार घेणे तेवढेच गरजेचे असते.

**शुगर कंट्रोल कशी करायची ?**

रात्रीचे जेवण झोपण्याआधी किमान २ ते ३ तास आधी खावे

हलके आणि संतुलिक अन्नाची निवड करावी

रात्री उशीरा गोड आणि तळलेले तिखट खाणे टाळावे

रोज थोडी शारीरिक एक्टिव्हीटी करावी

रोज खाण्याची आणि झोपण्याची वेळ फिक्स ठेवा

# त्वचा सुंदर बनविण्यासाठी चॉकलेट वापरून बनवा फेस मास्क

लहान मुलांपासून ते अगदी घरातील वडिलधाऱ्या मंडळींपर्यंत सर्वांचाच, चॉकलेट हा मनापासून आवडणारा पदार्थ आहे. काहीतरी गोड खाण्याची इच्छा अनावर होत असेल, तर गोड पदार्थ बनवत बसण्यापेक्षा एखादे चॉकलेट पटकन उचलून तोंडात टाकणे हा सर्वात सोपा पर्याय आहे. पण दुर्दैवाने हा पर्याय आपल्या वजनाकरिता तेवढा चांगला नाही. चॉकलेटचा भरपूर वापर, खाण्याऐवजी त्वचेचे सौंदर्य वाढविण्यासाठी जर केला गेला, तर त्याचा चांगलाच फायदा दिसून येतो. चॉकलेटमध्ये अँटी ऑक्सिडंट्स आणि त्वचेला आर्द्रता देऊन मृदू बनविणारे घटक मोठ्या प्रमाणामध्ये असून, त्यामुळे त्वचा नितळ व सुंदर दिसू लागते.



चॉकलेट आणि ओटमील वापरून बनविलेला फेस मास्क तेलकट त्वचा असणाऱ्या किंवा ज्याच्या चेहऱ्यावर मुरुमे पुटकुळ्या येतात, अश्या व्यक्तींकरिता उत्तम आहे. ह्या मास्क मुळे त्वचेवरील मृत पेशी हटविल्या जाऊन त्वचा नितळ होते. हा फेस मास्क बनविण्याकरिता एक मोठा चमचा कोको पावडर, दोन चमचे ओटमील आणि थोडा मध एकत्र करून हे मिश्रण चेहऱ्याला लावावे. पंधरा मिनिटे हा मास्क चेहऱ्यावर राहू देऊन मग कोमट पाण्याने चेहरा धुवून टाकावा.

साखरेमध्ये त्वचेला मृदू बनविणारे ग्लायकोलिक ॲसिड असते, तर कॉफीमध्ये त्वचेवरील सुरकुत्या कमी करणारी तत्वे असतात. ह्या दोन्हीचा वापर करूनही चांगला फेस मास्क तयार करता येतो. अर्धा कप ब्राऊन शुगर मध्ये चार मोठे चमचे कॉफी पावडर घालावी. त्यामध्ये दोन मोठे चमचे कोको पावडरही मिसळावी. या मध्ये थोडेसे मध घालून घट्ट पेस्ट तयार करावी व या पेस्ट ने चेहऱ्यावर हळुवार मसाज करावा. या स्क्रब मुळे त्वचेवरील मृत पेशी निघून जाऊन चेहरा तजेलदार दिसू लागतो.



चॉकलेट बॉडी बटर चा वापर संपूर्ण शरीरावरील त्वचेला आर्द्रता मिळावी म्हणून करवयाचा असतो. अर्धा कप चॉकलेट बटर मध्ये अर्धा कप कोको पावडर व थोडेसे खोबरेल तेल घालून हे मिश्रण वीस मिनिटे फ्रीज मध्ये ठेवावे. फ्रीज मध्ये ठेवल्यानंतर हे मिश्रण काहीसे घट्ट होते. त्यानंतर एका हँड ब्लेंडरच्या मदतीने हे मिश्रण चांगले फेटून घ्यावे. त्यानंतर आपल्या आवडीच्या सुवासाच्या इसेन्शियल ऑईल चे काही थेंब या मिश्रणात घालावेत. हे बॉडी बटर संपूर्ण शरीरावर लावून वीस मिनिटे ठेवावे, व त्यानंतर कोमट पाण्याने अंग धुवून टाकावे. तयार चॉकलेट बटर बाजारामध्ये मिळते. यामध्ये बाकीचे साहित्य घालून बॉडी बटर घरच्याघरी तयार करता येते.

# जास्वंदीच्या फुलाचे आरोग्यासाठी फायदे

गणपतीला प्रिय असलेले, अतिशय मोहक दिसणारे जास्वंदीचे फूल अनेक रंगांमध्ये बघायला मिळते. लाल, पांढरा. पिवळा, गुलाबी, अश्या अनेक रंगांमध्ये हे फूल बघावयास मिळते. या फुलाला हिबिस्कस रोजा सिनेन्सीस असे शास्त्रीय नाव आहे. पण हे फूल केवळ दिसायला सुंदर नाही, तर आरोग्यासाठी ही विशेष गुणकारी आहे. या फुलामध्ये अनेक प्रकारची पोषक तत्वे आहेत. या फुलामध्ये क जीवनसत्व, कॅल्शियम, फायबर, लोह, वासा ही पोषक द्रव्ये मुबलक मात्रेमध्ये असून, अनेक व्याधींच्या औषधोपचारासाठी या फुलाचा उपयोग केला जातो.

जास्वंदीच्या फुलांचा वापर करून बनविलेला काढा आपल्या शरीरातील कोलेस्टेरोलची मात्रा नियंत्रित ठेवण्यास लाभकारक आहे. यामध्ये असलेली पोषक द्रव्ये हृदयनलिकांमध्ये प्लाकपासून तयार होणारा अवरोध रोखतात. त्यामुळे आपल्या शरीरातील अतिरिक्त कोलेस्टेरोल कमी होण्यास मदत मिळते. तसेच जास्वंदीची पाने उच्च रक्तदाब असणाऱ्यांसाठी गुणकारी आहेत. जास्वंदीची पाने पाण्यामध्ये घालून ते पाणी उकळून त्याचे सेवन केले असता, हृद्याची जलद गती संथ होण्यास सहाय्य मिळून शारीरिक थकवा दूर होतो.



जास्वंदीच्या फुलांचा उपयोग शरीरातील रक्ताच्या कमी करिता, म्हणजेच अनिमिया करिता करता येतो. शरीरामध्ये लोहाच्या कमीमुळे अनिमिया होतो. ही कमी दूर करण्यासाठी चाळीस ते पन्नास जास्वंदीच्या कळ्या वाटून घेऊन त्याचा रस काढून घ्यावा.

हा रस एका घट्ट झाकणाच्या बाटलीत भरून ठेवावा. रोज सकाळी एक लहान चमचा जास्वंदीचा रस दुधाबरोबर घ्यावा. या रसाच्या सेवनाने लोहाची कमी दूर होऊन शरीरामध्ये स्फूर्ती वाढते. तसेच जास्वंदीच्या पानांचा काढा काही दिवस ओळीने घेतल्यास किडनी स्टोन विरघळण्यास सहाय्य मिळते.

ज्यांना ऋतुमान बदलते तेव्हा किंवा प्रदूषित हवेमुळे श्वसनासंबंधी रोगांचा त्रास होतो, किंवा ज्यांना दमा, थोड्या श्रमांनी धाप लागणे अश्या तक्रारी असतात, त्यांनी जास्वंदीची फुले घालून उकळून तयार केलेला काढा साखर न घालता घ्यावा. जास्वंदीमध्ये असललेल्या क जीवनसत्व, क्षार आणि अँटी ऑक्सिडंट्स मुळे श्वसनाच्या तक्रारी दूर होतात. तसेच या काढ्याच्या सेवनाने कफ आणि घसादुखीही बरी होते.

# भविष्याचे रागरंग




**मेष :** प्रेमसंबंध अधिक दृढ होतील. घरातील टापटीपीवर लक्ष द्याल. वैवाहिक सौख्यात भर पडेल. भागीदाराशी संबंध सुधारतील. तुमचा परिचय अधिक वाढेल. उत्तम वैवाहिक सौख्य लाभेल.




**वृषभ :** हाताखालील नोकरांकडून कामे जलद गतीने पार पडतील. कामे मनाजोगी पार पडतील. क्षुल्लक गोष्टींकडे दुर्लक्ष करावे. जवळचे नातेवाईक भेटतील. दिवस मजेत जाईल.




**मिथुन :** जुकरमणुकीवर अधिक बर द्याल. मैत्रीचे संबंध अधिक घट्ट होतील. स्वच्छंदीपणे विचार कराल.छंद जोपासाल. तुमचा लोकसंग्रह वाढेल. गैरसमज टाळावेत.




**कर्क :** कामातील अडचणी दूर कराव्यात. उत्साहाने कामे हाती घ्याल. कामामुळे थकवा जाणवू शकतो. तत्परतेने कामे कराल.वादाचे प्रसंग टाळावेत. धार्मिक कामात सहभाग घ्याल.




**सिंह :** जुन्या गोष्टी फार मनावर घेवू नयेत. जोडीदाराच्या आरोग्याची काळजी घ्यावी. पायाचे विकार जाणवतील. घराबाहेर वावरतांना काळजी घ्यावी. विचार भडकपणे मांडू नयेत.




**कन्या :** कुटुंबाच्या प्रगतीचा आधी विचार कराल. आर्थिक उन्नती साधता येईल. कौटुंबिक सौख्यात भर पडेल. स्थावर मालमत्ता वाढवाल. घराचे नुतनीकरण कराल.




**तुळ :** कामात सकारात्मक बदल करावेत. कामाची गती वाढेल. मनाजोगा फायदा करून घेता येईल. व्यापाऱ्यांनी सतर्कता दाखवावी. सरकारी कामावर वेळ खर्च होईल.




**वृश्चिक :** चुकीच्या संगतीत अडकू नका. मनात आकारण भीती बाळगू नका. मानसिक चंचलता जाणवेल. तारतम्यता बाळगावी.




**धनु :** काही कामांना पुरेसा वेळ द्यावा. योग्य व्यक्तीचा सल्ला घ्यावा. स्त्रीदाक्षिण्य दाखवाल. जवळचे मित्र भेटतील.एकाच गोष्टीवर फार काळ रेंगाळत राहू नका. झोपेची तक्रार जाणवेल.




**मकर :** जोडीदाराचे कौतुक कराल. सामाजिक वजन वाढेल. नावलौकिकास पात्र व्हाल. अपेक्षित वेळेत कामे पूर्ण होतील.




**कुंभ :** कामावर श्रद्धा ठेवाल. वैचारिक भव्यता दाखवाल. बौद्धिक दृष्टीकोनातून विचार कराल. दानशूरता दाखवाल. स्वत:चा मान जपाल. दूरच्या प्रवासाचे योग येतील.




**मीन :** मुलांच्या कारवायांकडे लक्ष द्यावे. नातेवाईकांशी सलोखा वाढवावा.अचानक धनलाभाची शक्यता. कौटुंबिक गैरसमज टाळावेत. हितशत्रूंवर लक्ष ठेवावे.

# आलदर हॉस्पिटल'मध्ये प्रसूतीनंतर गुदमरलेल्या कमी दिवसाच्या नवजात बालकाला जीवदान

सांगोला (प्रतिनिधी):वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती आणि डॉक्टरांच्या प्रयत्नांमुळे सांगोला येथील डॉ.महावीर आलदर यांच्या आलदर हॉस्पिटलमध्ये एका नवजात बालकाला मृत्यूच्या दारातून सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे. कडलास (ता. सांगोला) येथील या चिमुरड्याला यशस्वी उपचारांनंतर नवीन आयुष्य मिळाले आहे.

कडलास येथील प्रसुतीनंतर गुदमरलेल्या कमी दिवसाच्या नवजात बालकाला श्वसनाचा तीव्र त्रास जाणवू लागला. बाळाची गंभीर अवस्था पाहून डॉक्टरांनी विलंब न लावता तातडीने उपाययोजना सुरू केल्या. बाळाला श्वास घेता यावा यासाठी त्याला कृत्रिम श्वसन प्रणालीवर ठेवण्यात आले. डॉक्टरांचे बारकाईने लक्ष आणि योग्य उपचार यामुळे बाळाच्या प्रकृतीत सकारात्मक बदल दिसून आले.

उपचारांना प्रतिसाद देत बाळाच्या श्वसन प्रक्रियेत लक्षणीय सुधारणा झाली. त्यानंतर काही दिवस बाळाला निरीक्षणाखाली ठेवून नॉर्मल ऑक्सिजन देण्यात आला. बाळाने उपचारांना दिलेली साथ आणि डॉक्टरांचे कौशल्य यामुळे बाळ आता पूर्णपणे धोक्याबाहेर आहे. उपचार यशस्वी ठरल्यानंतर बाळाच्या श्वसन प्रक्रियेत सुधारणा झाली.



सुरक्षिततेचा उपाय म्हणून पुढील काही दिवस बाळाला नैसर्गिक ऑक्सिजनवर ठेवून त्याच्या प्रकृतीवर लक्ष ठेवण्यात आले. बाळाची प्रकृती आता पूर्णपणे सुधारली असून, डॉक्टरांनी त्याला सुखरूप घरी सोडले आहे.

कडलास येथील या बाळाला मिळालेल्या जीवदानामुळे कुटुंबीयांनी डॉ.महावीर आलदर यांचे आणि आलदर हॉस्पिटल प्रशासनाचे आभार मानले आहेत. ग्रामीण भागातील मुलांसाठी अशा प्रकारच्या अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध झाल्यामुळे समाधान व्यक्त होत आहे.

# पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुजारवाडी येथे नगराध्यक्ष श्री.आनंदा माने यांचा सत्कार



सांगोला (प्रतिनिधी):- पीएमश्री जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समिती पुजारवाडी यांच्यावतीने लोकनियुक्त नगराध्यक्ष श्री.आनंद भाऊ माने तसेच नगरसेविका सौ.राणीताई माने, सौ छायाताई मेटकरी, सौ. वैशाली सावंत व नगरसेवक श्री.चैतन्य राऊत व श्री.काशिलिंग गावडे यांचा सत्कार व सन्मान सोहळा आयोजित करण्यात आलेला होता.

यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष श्री.आनंद भाऊ माने यांचा सत्कार शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.अमर जाधव यांनी केला. यावेळी नगराध्यक्ष श्री.आनंद भाऊ माने यांनी शाळेला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे अभिवचन दिले. सौ.राणीताई माने यांचा सत्कार शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या कौसर मुलाणी यांनी केला. सत्कार सोहळ्याच्या प्रसंगी सौ.राणीताई माने यांनी मुलांना स्वच्छतेचे, शिक्षणाचे महत्व सांगितले. पुजारवाडी शाळा नामांकित असून माझ्या परिसरातील आहे व शाळेच्या नावलौकिक वाढवण्यासाठी सर्व सहकार्य करण्याचे सांगितले.

नगरसेविका सौ.छायाताई मेटकरी यांचा सत्कार शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या सौ.आम्रपाली माने व सौ.काटे मॅडम यांनी केला. नगरसेविका सौ.वैशाली सावंत यांचा सत्कार शाळा समितीच्या सदस्या सौ.चंदनशिवे ताई यांनी केला. तर नगरसेवक श्री.काशिलिंग गावडे यांचा सत्कार शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री.भोसले सर यांनी केला. नगरसेवक श्री.चैतन्य राऊत यांचा सत्कार शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री.समाधान माने यांनी केला.

सदर सत्कार सोहळ्यासाठी शाळा समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, पालक, शाळेची माजी मुख्याध्यापक लवटे सर उपस्थित होते. सूत्रसंचालन शाळेतील शिक्षक श्री कैलास होवाळ सर यांनी केले. प्रास्ताविक व आभार शिक्षक श्री.संजय लवटे सर यांनी केले.

# मुलांना घडविण्यासाठी आईवडिलांनी सजग राहिले पाहिजे- डॉ. शालिनी कुलकर्णी

## फॅबटेक पब्लिक स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज मध्ये सजग पालकत्व कार्यशाळा संपन्न



सांगोला (प्रतिनिधी):- आईवडिल मुलांना घडविण्यासाठी वाढविण्यासाठी, एक चांगली व्यक्ती बनविण्यासाठी सारखीच मेहनत घेतात. आई मुलांच्या आयुष्याचा पाया रचते आणि त्यांना आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करते, म्हणूनच 'आई' हे मुलांच्या जडणघडणीतील सर्वात महत्त्वाचे स्थान आहे. संस्कार हे आपल्या चालण्या - बोलण्यातून येत नाहीत तर ते वर्तनातून व आचरणातून येत असतात. घरातील सगळ्या गोष्टींचे मुले बारकाईने निरीक्षण करत असतात. चांगल्या वाईट गोष्टी ते चटकन ग्रहण करतात, त्यामुळे परिवारात कसे वागायचे याचे भान आईवडीलांनी ठेवणे गरजेचे आहे. मुलांचा मानसिक आणि भावनिक विकास कसा करावा, ताण, भीती आणि कमी आत्मविश्वास याचे व्यवस्थापन कशा पद्धतीने करावे, पालकांनी कोणत्या प्रकारे सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे. मुलांना घडविण्यासाठी आईवडिलांनी सजग राहिले पाहिजे असे मत डॉ. शालिनी कुलकर्णी यांनी बोलताना व्यक्त केले.

कार्यक्रमाचे उद्धाटन डॉ. शालिनी कुलकर्णी, सुरेखा रुपनर, प्राचार्य सिकंदर पाटील, वनिता बाबर यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून करण्यात आले. डॉ. शालिनी कुलकर्णी यांचे स्कूलच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

या कार्यशाळेत मोठ्या संख्येने पालक वर्ग सहभागी झाला होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका शितल बिडवे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फॅबटेक पब्लिक स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज मधील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# निवडणूक आयोगानं सांगितलं तर लाडक्या बहिणींचे पैसे १६ तारखेला देणार, अजित पवार



पुणे : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुन्हा एकदा राजकारणाच्या केंद्रस्थानी आलेली आहे. लोकसभा निवडणुकीत फटका बसल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या सरकारनं लाडकी बहीण योजना आणली, या योजनेमुळं राज्यात महायुतीला सत्ता मिळाली. आता महापालिका निवडणुकीच्या काळात लाडकी बहीण योजना चर्चेत आली आहे. भाजप नेते मंत्री गिरीश महाजन, मुंबईतील भाजपच्या उमेदवार तेजस्वी घोसाळकर यांनी लाडक्या बहिणींना मकर संक्रातीपूर्वी डिसेंबर आणि जानेवारीचे हप्ते एकत्र म्हणजेच ३००० रुपये मिळणार असल्याच्या पोस्ट शेअर केल्या. सत्ताधाऱ्यांच्या या प्रचारानंतर काँग्रेसनं निवडणूक आयोगाल पत्र लिहून १४ जानेवारीनंतर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणचे पैसे द्यावेत असं म्हटलं. याच पत्रात त्यांनी लाडकी बहीण योजनेच्या विरोधात नसल्याचं म्हटलं होतं. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. निवडणूक आयोगानं सांगितलं तर १४ जानेवारीचा हप्ता पुढे ढकलू, असं अजित पवार म्हणाले.

# डाळिंब फळबाग विमा योजनेमध्ये सहभागी घेण्यासाठी १४ जानेवारीपर्यंत अंतिम मुदत

सांगोला (प्रतिनिधी):- अंबिया बहरामधील डाळिंबासाठी विमा योजना राबवण्यात येणार असून, डाळिंब फळबाग विमा योजनेत दोन वर्ष वय पूर्ण असलेल्या डाळिंब बागेस विमा कंपनी मार्फत प्रति हेक्टर १ लाख ६०,००० रुपये विमा संरक्षण प्रदान करण्यात येणार आहे. तरी तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी विमा योजनेत सहभागी व्हावे. १४ जानेवारीपर्यंत अंतिम मुदत देण्यात आल्याची माहिती सांगोला कृषी विभागामार्फत देण्यात आली आहे.

डाळिंब पिकासाठी सांगोला तालुक्यातील अधिसूचित महसूल मंडळात लागू आहे. या तालुक्यात शासनामार्फत अधिसूचित महसूल मंडळ पातळीवर असलेल्या महावेध प्रकल्पांतर्गत स्थापन केलेल्या हवामान केंद्र आकडेवारीवरून नुकसान भरपाई अंतिम केली जाते. या योजनेअंतर्गत दोन वर्ष वय पूर्ण असलेल्या डाळिंब बागेस विमा कंपनी मार्फत प्रति हेक्टर १ लाख ६०,००० रुपये विमा संरक्षण प्रदान करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांसाठी विमा हप्ता ८ हजार ते २० हजार रुपये प्रति हेक्टर असणार आहे. गारपिटीपासून १५ जानेवारी ते ३० एप्रिलपर्यंत कालावधीसाठी विमा संरक्षित रक्कम : ५३,००० रुपये प्रति हेक्टरसाठी शेतकऱ्यांना विमा हप्ता २,६५० रुपये प्रति हेक्टर इतका असणार आहे. गारपिटीमुळे नुकसान झाल्यास नुकसानीबाबत संबंधित विमा कंपनीला घटना घडल्यापासून ७२ तासांच्या आत सूचना देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांसाठी विमा हप्ता हा सर्वसाधारणपणे विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्क्यांच्या मर्यादेत असतो. मात्र एकूण वास्तव दर्शी विमा हप्ता ३५ टक्यांहून अधिक असल्यास त्या अधिक विमा हप्त्यातील ५० टक्के भार शेतकऱ्यांना उचलावा लागतो. विमा हप्ता दर जिल्हानिहाय वेगवेगळे असू शकतात. त्यामुळे शेतकऱ्याने भरवायच्या विमा हप्त्यात जिल्हानिहाय फरक असू शकतो.

योजनेत अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित फळपिकासाठी सर्व शेतकरी भाग घेवू शकतात. योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याचा ग्रीटेक नोंदणी क्रमांक आवश्यक आहे. ज्या शेतकऱ्यांनी डाळिंब पिकासाठी मृग बहर २०२५ मध्ये सहभाग घेतला आहे, त्यांना त्याच क्षेत्रासाठी आंबिया बहरामध्ये विमा संरक्षण घेता येणार नाही. पीककर्ज घेणाऱ्या आणि बिगर कर्जदारांसाठी योजनेतील सहभाग ऐच्छिक राहणार आहे. बिगर कर्जदार शेतकरी विहित मुदतीत बँकेने किंवा ऑनलाइन फळपीक विमा पोर्टल www.pmfby.gov.in वर विमा हप्ता जमा करून सहभाग घेऊ शकतात. त्यासाठी agristack नोंदणी क्रमांक, आधार कार्ड, जमीन धारणा ७/१२, ८ (अ) उतारा आणि पीक लागवड स्वयंघोषणा पत्र, फळबागेचा जिओ टॅगिंग केलेला फोटो, बँक पासबुकवरील बँक खात्याबाबत सविस्तर माहिती लागेल. कॉमन सर्व्हिस सेंटर मार्फत अर्ज ऑनलाइन भरता येतील. एक शेतकरी त्याच्याकडे एकापेक्षा अधिक फळपिके असल्यास योजना लागू असलेल्या पिकांसाठी तो विमा योजनेत सहभाग घेऊ शकतो (मात्र त्या फळपिकासाठी ते महसूल मंडळ अधिसूचित असणे आवश्यक आहे.

सदर फळपीक विमा योजनेतील शेतकऱ्यांनी ई -पीक पाहणी करणे अनिवार्य आहे.विमा योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी आणि विमा नुकसान भरपाई मिळण्यासाठी शेतकऱ्याचे बँक खाते आधार आधारित पेमेंटसाठी लिंक असावे. असेही सांगोला कृषी विभागा मार्फत सांगण्यात आले आहे.

# गुणांच्या सादरीकरणाने उद्दिष्ट गाठता येते- प्रमोद पाटील



सोलापूर (प्रतिनिधी):- ग्रंथालय संचालक मुंबई व सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ,सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा २०२६ केंद्र सोलापूरच्या वर्गाचा शुभारंभ रविवार दिनांक ११ जानेवारी रोजी करण्यात आला.

सदर कार्यक्रमास प्रमोद पाटील तांत्रिक सहाय्यक जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,सोलापूर व संजय ढेरे ग्रंथालय निरीक्षक जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,सोलापूर संघाचे अध्यक्ष ज्योतीराम गायकवाड, उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे , कार्यवाह साहेबराव शिंदे, सहकार्यवाह भास्कर कुंभार, मुख्याध्यापक अविनाश गायकवाड, वर्ग व्यवस्थापक कुंडलिक मोरे, शिक्षक दत्ता मोरे ,गणेश फंड,वृषाली हजारे, लिपिक दिपाली नरखेडकर, सेवक गीतांजली गंभीरे, सौ विमल ढेरे यांच्यासह वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते.

आपले अध्यक्षीय भाषणात श्री.पाटील यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर उत्साह पूर्ण शैलीने आपल्याजवळ असलेल्या गुणांच्या सादरीकरणाने उद्दिष्ट गाठता येते याची खात्री दिली. मनोरंजनात्मक उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. संजय ढेरे यांनी ग्रंथालय क्षेत्रातील करिअर करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ वृषाली हजारे यांनी केले तर प्रास्ताविक अविनाश गायकवाड यांनी केले.

शेवटी आभार दत्ता मोरे यांनी मानले. ग्रंथालय चळवळीचे आधारस्तंभ महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष, माजी विधान परिषद सदस्य गंगाधर पटणे यांच्या निधनाची वार्ता दुःखद वार्ता समजल्याने त्यांना श्रद्धांजली यावेळी वाहण्यात आली

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवकतेवाडी येथे भरला आनंद बाजार



सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवकतेवाडी येथे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा तसेच त्यांचे व्यवहारज्ञान वृध्दिंगत व्हावे यासाठी जि.प. प्रा.शाळा देवकतेवाडी येथे शनिवार दि १० रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत आनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. बाल आनंद बाजाराचे उद्धाटन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बापुसो देवकते व शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी पालक ग्रामस्थ यांच्या हस्ते करण्यात आले. सदर बाजारामध्ये एकूण ३० ते ३५ स्टॉल लावण्यात आले होते. यामध्ये भाजीपाला, चहा, भजी, बासुंदी, वडापाव, भेळ, किराणामाल, गृहपयोगी साहित्य, नाष्टा, खेळणी आदी प्रकारचे स्टॉल विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने सजवले होते.

मुख्याध्यापक कांबळे गुरुजी, तांबोळी गुरुजी व अंगणवाडी शाळेच्या शिनगारे मॅडम, मदतनीस हसीना मॅडम यांनी चांगल्याप्रकारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत यशस्वी आयोजन केले.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकांचे भविष्य आज सुप्रीम कोर्टात ठरणार

सांगोला: जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने सचिन देशमुख यांनी दाखल केलेली याचिका त्याचबरोबर पूर्वीची राहुल रमेश वाघ यांनी दाखल केलेली याचिका या याचिकेची सुनावणी एकत्रित होऊन आज सोमवार दिनांक १२ जानेवारी रोजी होणार आहे आणि सुनावणीनंतर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या दृष्टीने सुप्रीम कोर्ट महत्वाचा निर्णय देईल त्यामुळे कदाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका ह्या लांबण्याची शक्यता असल्याचे अ‍ॅड.सचिन देशमुख यांनी सांगितले.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या संदर्भात सांगोला येथील अ‍ॅड सचिन देशमुख यांनी दिल्ली येथील सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून त्या याचिकेचा नंबर २८/२०२६ असा आहे सदर याचिकेमध्ये सचिन देशमुख यांनी अशी मागणी केली आहे की भारत निवडणूक आयोगाने मतदार यादी जाहीर केल्यानंतर ती मतदार यादी राज्य निवडणूक आयोग विकत घेते आणि त्यानुसार ती प्रसिद्ध करून निवडणुका जाहीर केल्या जातात भारत निवडणूक आयोग हे वर्षातून दोनदा १ जुलै व १ जानेवारी रोजी नवीन मतदारांना समाविष्ट करून मतदार यादी प्रसिद्ध करत असते त्याप्रमाणे राज्य निवडणूक आयोग या याद्या प्रसिद्ध झाल्यावर त्यानुसार निवडणूक कार्यक्रम जाहीर करत असते, त्याप्रमाणे जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ ही कट ऑफ डेट ठेवून त्या मतदार यादीनुसार निवडणूक कार्यक्रम जाहीर करणार असे जाहीर केलेले आहे.

सचिन देशमुख यांचे म्हणणे असे आहे कि वास्तविक १ जुलै २०२५ ते १ जानेवारी २०२६ या सात महिन्यांमध्ये या राज्यामध्ये हजारो नवं मतदार १८ वर्षे पूर्ण केलेले आहेत या मतदारांना निवडणुकीपासून वंचित ठेवता येणार नाही तसेच सदर काही नवीन मतदार त्यांची लग्न होऊन या गावातून त्या गावात गेलेले आहेत किंवा काही मतदार दुसऱ्या गावात स्थलांतरित होऊन रहिवासी झालेले आहेत त्यांना १ जुलै नंतर यादीत नाव समाविष्ट न झाल्यामुळे निवडणुकीत उभा राहता येणार नाही त्यामुळे घटनेच्या आर्टिकल १४,३२६ २४३ सेक्शन १४ १५ २७ प्रमाणे जे घटनेने दिलेले अधिकार आहेत त्याची पायमल्ली होते म्हणून या नवीन मतदारांना निवडणुकीपासून वंचित ठेवता येणार नाही म्हणून निवडणूक आयोगाने १ जानेवारी २०२६ पर्यंतचे नवीन मतदार झालेले आहेत त्यांना मतदार यादीत समाविष्ट करावं आणि मगच निवडणूक घ्याव्यात अशी मागणी केलेली आहे.

त्याचबरोबर दुसरी मागणी अशी आहे की औरंगाबाद हायकोर्टाने दिलेल्या गाईडलाईन प्रमाण एका निवडणुकीचा निकालाचा प्रभाव दुसऱ्या निवडणुकीच्या मतदानावर होऊ नये म्हणून एक निवडणूक घेतल्यानंतर त्याचा निकाल दुसरी निवडणूक होईपर्यंत राखून ठेवला जातो हे आपण नगरपालिकेला पाहिल आहे त्यामुळे राज्यातील बारा जिल्हा परिषदेने १२५ जिल्हा परिषद च्या निवडणुका घेतल्या तर त्या निकालचा प्रभाव उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे निवडणुकीत पडणार आणि निवडणुकीच्या कायद्याचे आणी मा.ना.हायकोर्ट नी दिलेल्या गाईडलाईंनचे उल्लंघन होणार आहे म्हणून त्यामुळे कदाचित १२ जिल्हा परिषदेने १२५ पंचायत समिती याची निवडणूक झाल्यावर त्यांचे निकाल राखुन ठेवण्याची भीती आहे त्यामुळे याचिकेत अशी मागणी आहे की या नव मतदारांना समाविष्ट करून राज्यातील संपूर्ण जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका एकत्रातच घ्याव्या ही याचिका शुक्रवारी मेन्शन झाली आणी सर्वोच्च न्यायालयाचे चीफ जस्टिस यांनी या याचिकेची दखल घेऊन तिची सुनावणी सोमवारी १२ जानेवारी रोजी ठेवली आहे त्याच बरोबर राज्य निवडणूक आयोगाच्या विरोधात जी याचिका आरक्षण उल्लंघनाबाबत राहुल रमेश वाघ याची सुनावणी २१ तारखेला ठेवलेली होती ती याचिका आणि सचिन देशमुख यांनी दाखल केलेली याचिका याची एकत्रित सुनावणी सोमवार दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी ठेवलेली आहे त्यातच आज राज्य निवडणूक आयोगाने प्रतिज्ञापत्र ऑनलाइन पद्धतीने मा. ना. सुप्रीम कोर्टामध्ये सादर करून ३१ जानेवारी रोजी निवडणूक घेण्यास अस्मार्थता दर्शवून निवडणूक घेण्यास १० फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ मागितली असल्याचे अ‍ॅड.सचिन देशमुख यांनी सांगितले.

# लोकनियुक्त नगराध्यक्ष यु.टी.जाधव यांचा नाझरे येथे सत्कार

नाझरा (वार्ताहर):- शिक्षकी पेशातून रस्त्यावर लढलो व रणांगण हरले परंतु मन हरले नाही व नाझरे ता. सांगोला येथे आपण आज माझे मतदार नसताना सुद्धा सत्कार करीत आहात त्याचा आम्हास अभिमान असून, आपण यापुढे येथील व्यापाऱ्यांचे प्रश्न व शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी संघटना पाहणार नाही, त्यांना न्याय मिळवून देऊ व यासाठी एक कॉल करा म्हणजे एक कॉल प्रॉब्लेम सॉल अशी रचना करू अशी आटपाडीचे लोकनियुक्त नगराध्यक्ष यु टी जाधव यांनी नाझरे ग्रामपंचायत समोर सत्कार प्रसंगी मत व्यक्त केले.

यावेळी नगरसेविका ललिता जाधव, सौ.स्वाती सातारकर, सुभाष सातारकर, शिक्षक नेते रवी पाटील, लोकनियुक्त नगराध्यक्ष यु.टी. जाधव व त्यांच्या धर्मपत्नी सौ.अनिता जाधव यांचा सपत्नीक भव्य सत्कार करण्यात आला. तसेच शाळा व्यवस्थापन अध्यक्ष सुभाष कोकरे, पत्रकार रविराज शेटे यांचाही सत्कार करण्यात आला. सुरुवातीस सर्वांचे स्वागत प्रा.विजय गोडसे यांनी केले. यावेळी सुनील चौगुले, अशोक पाटील, शिवाजीराव होनमाने, सुनील बनसोडे, राजाराम बनसोडे, नयन पाटील, रवी पाटील, नंदकुमार रायचुरे, उल्हास धायगुडे, दादासो हरिअर यांनी मनोगत व्यक्त केले.

सदर प्रसंगी सरपंच डॉ.विजय सरगर, संजय सरगर, महालिंग पाटील, शशिकांत पाटील, दिलीप बनसोडे, संजय आदाटे, भारत बनसोडे, अडसूळ भाऊसो, बसवेश्वर आदाटे, राजू खोकले, सौ. कस्तुरा पाटील, रविराज स्वामी, जयंत काका देशपांडे, आनंदा कोकरे, प्रा.टी.के.वाघमारे, प्रा.महालिंग पाटील, श्रीमंत सरगर, गोरख भाऊ आदाटे, अप्पू राज आदाटे, तुकाराम कुंभार, बाळासो वाघमारे, भारत वाघमारे, सागर वाघमारे, सिताराम बनसोडे, हनुमंत खंडागळे, एकनाथ जावीर, संजय बनसोडे, विजय जावीर, गंगाधर जुंदळे, मनोहर बंदवडे, राजाराम पाटील, प्रसाद देशपांडे, सुधीर बनसोडे, संतोष आदाटे, बाळासो बनसोडे, सचिन धोकटे, शिवाजी अडसूळ, सुरेश बनसोडे यांच्यासह शिक्षक वर्ग, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्वांचे आभार शिवभूषण ढोबळे यांनी मानले.

पाहिजेत
कॅडबरी कंपनीच्या मार्केटिंग साठी
* सेल्समन (ऑर्डर साठी) पुरुष १/ महिला १
* वसुली साठी १
संपर्क
पियुष एजन्सीज्, कोष्टी गल्ली, सांगोला
9595207207 / 9890846691

स्कीन क्लिनिक
डॉ.करमुडे यु.एम. एम.बी.बी.एस.एम.डी.पुणे (त्वचारोग तज्ञ)
मो.७०८३३३४४३४, ९९७५७०७७२७
सेवानिवृत्त प्रमुख डॉक्टर, त्वचारोग विभाग, ससून हॉस्पिटल, पुणे
ठिकाण:- सांगोला, म.फुले चौक (पुतळ्याजवळ), महात्मा फुले संकुल, तळमजला, बी-१ (नवीन इमारत)

डॉ.करमुडे यु.एम.
वेळ-दररोज दुपारी १२ ते सांय.५ (शनिवारी बंद)

वन बीएचके फ्लॅट विकणे/ भाड्याने देणे आहे.
सांगोला शहरातील एखतपूर रोडवरील बनकर वस्ती येथील सर्व सोईनियुक्त १ बीएचके फ्लॅट विकणे अथवा भाड्याने देणे आहे.
(३ बाल्कनी, कन्सलंट वायरींग, ४ व्हीलर पार्कींग उपलब्ध)
किंमत १६ लाख रुपये (निगो.)
संपर्क:
9404249568, 7420842421

डॉ.बोराडे हॉस्पिटल
२४ तास अत्यावश्यक सेवा
मोबा: ९६३७२१८०९०
कडलास रोड, सांगोला.
हृदयविकार, रक्तदाब, मधुमेह, विषबाधा, पॅरेलेसिस फिट्स, लिव्हर, किडनीचे आजार या व अशा आजारावर निदान व उपचार
डॉ. प्रमोद धर्मराज बोराडे. MBBS D.N.B (मेडिसीन)
डॉ. सौ. प्राजक्ता प्रमोद बोराडे B.A.MS DRCH (स्त्री रोग तज्ञ)
आपल्या हक्काचं हॉस्पिटल डॉ.बोराडे हॉस्पिटल

# स्वखर्चातून विकासकामे; जवळा गटात अतुल पवार यांना नागरिकांची मोठी पसंती



सांगोला(प्रतिनिधी):- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष अतुल पवार यांनी स्वखर्चातून राबवलेल्या विविध विकासकामांमुळे जवळा जिल्हा परिषद गटात नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर सकारात्मक प्रतिसाद उमटत आहे. रखडलेली अनेक कामे त्यांनी स्वतःच्या खर्चातून पूर्ण केल्याने सामान्य जनतेला थेट लाभ झाला आहे.

नुकतेच जवळा गटातील विविध गावात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सांगोला तालुका अध्यक्ष अतुल पवार यांच्या हस्ते विविध कामाचे उद्घाटन करण्यात आले.या मध्ये मांजरी (राणोबा मळा) येथील येडोबा मंदिर परिसरात पेव्हींग ब्लॉक बसवण्याच्या कामाचे उद्घाटन करण्यात आले. यामुळे मंदिर परिसर स्वच्छ, सुबक व सुरक्षित होणार आहे. तसेच संगेवाडी गावात पंढरपूर रोड ते शिवाजी खंडागळे यांच्या घरापर्यंत, तसेच पंढरपूर रोड ते महादेव मुंजाळ यांच्या घरापर्यंतच्या रस्त्यांचे मुरुमीकरण काम सुरू करण्यात आले आहे.

वाढेगाव परिसरात सावे रोड ते भोजने गुरुजी वस्ती, सावे रोड ते महांकाळ वस्ती, लक्ष्मीदहिवडी रोड ते अमोल दिघे वस्ती (संजय नगर) या रस्त्यांच्या मुरुमीकरण कामांचे उद्घाटन झाले आहे. या रस्त्यांमुळे वस्तीतील नागरिकांना दळणवळणासाठी मोठी सोय होणार आहे.

वाकी-घेरडी गावात घेरडी रोड ते येडवे-मुंजेवस्ती तसेच घेरडी शिव रोड ते निमंग्रे-येडवे वस्ती या रस्त्यांचे मुरुमीकरण काम सुरू करण्यात आले आहे. याशिवाय मेडशिंगी गावात सुरेश धायगुडे यांच्या घरापासून संभाजी लोखंडे यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याच्या मुरुमीकरण कामाचेही उद्घाटन करण्यात आले

जवळा गटातील रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा सुधारणा, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, तसेच नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित कामे तत्काळ मार्गी लावण्यात आली आहेत. कोणताही गाजावाजा न करता प्रत्यक्ष कामावर भर देण्याची भूमिका अतुल पवार यांनी घेतल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान आणि विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राजकीय पदाचा उपयोग न करता सामाजिक बांधिलकीतून स्व खर्चातून केलेल्या विकासकामांमुळे युवक, महिला व शेतकरी वर्गात अतुल पवार यांना मोठी पसंती मिळत असून, जवळा गटाच्या सर्वांगीण विकासासाठी अशीच कार्यशैली कायम ठेवावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# उद्योगपती विजय सुरवसे यांची पशुपालकांच्या प्रश्नांवर केंद्र सरकारकडे ठोस धडक

## सेक्स सॉर्टेड सिमेन व एम्ब्रियो तंत्रज्ञान स्वस्त दरात उपलब्ध करण्याची मागणी



सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला तालुक्याचा आवाज पुन्हा एकदा थेट दिल्लीत घुमला आहे. सांगोला येथील उद्योगपती, सामाजिक कार्यकर्ते व पशुपालक विजयसिंह गजानन सुरवसे यांनी देशभरातील शेतकरी व पशुपालकांना भेडसावणाऱ्या गंभीर अडचणींबाबत थेट केंद्र सरकारकडे निवेदन सादर केले आहे. ग्रामीण भागातील वास्तवाशी जोडलेले प्रश्न मांडणारा एक उद्योजक म्हणून विजय सुरवसे यांनी तळागाळातील पशुपालकांचा आवाज थेट राजधानीपर्यंत पोहोचवला आहे.

हे निवेदन केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह (ललन सिंह) यांना देण्यात आले आहे. यामध्ये पशुपालकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या सेक्स सॉर्टेड सिमेन व एम्ब्रियो ट्रान्सफर तंत्रज्ञान या विषयांवर ठोस मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

दरम्यान, आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनाही विजय सुरवसे यांनी पत्र देत या संपूर्ण विषयाची माहिती दिली. यावेळी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी विजय सुरवसे यांच्या कार्याचे कौतुक करत, पशुपालकांच्या प्रत्येक अडचणीवर जातीने लक्ष देण्याचे आश्वासन दिले.

आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख म्हणाले, सांगोला तालुका नेहमीच नव्या उपक्रमांमध्ये अग्रेसर राहिला आहे. तालुक्यातील उद्योगपतीने थेट केंद्र सरकारकडे जाऊन केवळ सांगोल्याचा नव्हे, तर देशातील प्रत्येक शेतकरी व पशुपालकाचा प्रश्न मांडला, ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे.

यावेळी विजय सुरवसे यांनी सांगितले की, सध्या महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांत सेक्स सॉर्टेड सिमेनचे दर अत्यंत जास्त आहेत. काही ठिकाणी हे दर २,००० रुपयांपासून थेट ४०,००० रुपयांपर्यंत असल्यामुळे सर्वसामान्य पशुपालकांना हे तंत्रज्ञान परवडत नाही. परिणामी, पारंपरिक सिमेनचा वापर करावा लागतो, ज्याचे दरही १,००० रुपयांपेक्षा कमी नाहीत. त्यामुळे बहुतांश वेळा नर वासरांचाच जन्म होऊन पशुपालकांवर आर्थिक ओझे वाढते. नर वासरांचे संगोपन, चारा-पाणी, तसेच विक्रीपर्यंतचा खर्च पशुपालकांसाठी मोठी अडचण ठरत आहे. ही समस्या दूर करण्यासाठी उत्तम दर्जाचे सेक्स सॉर्टेड सिमेन १०० ते ५०० रुपयांच्या दरात उपलब्ध करून देण्यात यावे, अशी ठोस मागणी केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे. यामुळे अधिक दूध देणाऱ्या गाई मिळून पशुपालकांचे उत्पन्न वाढण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच, आधुनिक एम्ब्रियो ट्रान्सफर तंत्रज्ञान सध्या महाग असल्याने ते सर्वसामान्य पशुपालकांच्या आवाक्याबाहेर आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानासाठी सरकारी अनुदान किंवा आर्थिक सहाय्य वाढवावे, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. यामुळे देशी व उच्च प्रतीच्या गाईंच्या पैदाशीस चालना मिळेल, असा विश्वास विजय सुरवसे यांनी व्यक्त केला. केंद्र सरकारने पशुपालकांच्या या मागण्यांकडे गांभीर्याने पाहून सेक्स सॉर्टेड सिमेन व एम्ब्रियो तंत्रज्ञान स्वस्त, सुलभ व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली आहे.

# चित्रकला ग्रेड परीक्षेत श्रीधर कन्या प्रशाला नाझरेचे उज्वल यश



सांगोला (प्रतिनिधी):- ऑक्टोबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत श्रीधर कन्या प्रशाला व ज्युनि. कॉलेज नाझरे यांनी उज्वल यशाची परंपरा कायम राखली.

सदर परीक्षेमध्ये ए श्रेणीत-१९, बी श्रेणीत-८ तर सी श्रेणीत-४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून गुणवंत विद्यार्थी पुढील प्रमाणे इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेत. 'ए'श्रेणी मिळवणारे विद्यार्थी- ऐश्वर्या बाबासाहेब ऐवळे, कोमल अरुण पाटील, कृतिका सुनील बंडगर, नंदिनी सचिन बंडगर, प्रज्ञा नंदकुमार चव्हाण, प्रियंका हनुमंत कुटे, रिया दामोदर आलदर, रिया रावसाहेब कोकरे,साक्षी दत्तात्रय विभुते, साक्षी संजय बंडगर, सार्थ रामविजय बंडगर, सायली नामदेव सरगर, शिवानी रामचंद्र खळगे, शिवानी विजय रेड्डी, श्रुती पुरुषोत्तम सूर्यवंशी, व बी श्रेणीत आदित्य निलेश देशमुख उत्तीर्ण झाले असून एलिमेंटरी ग्रेड परीक्षेमध्ये ए श्रेणी मिळवणारे विद्यार्थी- निशा नागेश वाघमारे, प्राजक्ता संजय भंडारे, रिया भाऊसाहेब जावीर, सबिया अस्लम मुलाणी. तर बी श्रेणी मिळवणारे विद्यार्थी-भारती सिद्धेश्वर कोकरे, जान्हवी शशिकांत गडहिरे, पुनम अनिल जाधव, समिक्षा बाळासाहेब आडसूळ, समृद्धी दत्तात्रय तोरणे, संस्कृती संतोष कोकरे, स्वरा शिवानंद स्वामी. व सी श्रेणी मिळवणारे विद्यार्थी- आर्या नितीन मेखले, प्रांजली अमृत पाटील, समर्थ सचिन कोकरे, श्रुती विकास मेखले.

सदर गुणवंत विद्यार्थ्यास कलाशिक्षक श्री. शिवभूषण ढोबळे यांचे सुयोग्य मार्गदर्शन लाभले तर संस्थेच्या उपाध्यक्षा- यमुनाताई पाटील, संचालिका सितादेवी चौगुले- पाटील, सहसचिव श्री.मुकुंदराव पाटील सर, प्राचार्या श्रीम. यास्मिन मुल्ला व सर्व शिक्षक सहकारी व पालक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.



# घेरडी येथील यशराज प्राथमिक शाळेची सहल उत्साहात संपन्न

घेरडी (प्रतिनिधी):-श्री सोमा (आबा) मोटे बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ घेरडी संचलित यशराज प्राथमिक शाळा घेरडी ची सहल दिनांक- ७ जानेवारी ते १० जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये पार पडली. पहिल्या दिवशी ७ तारखेला यशराज प्राथमिक शाळा घेरडी येथून सहलीचे प्रस्थान झाले. सुरुवातीला पाली या ठिकाणी बल्लाळेश्वर गणपती मंदिराचे दर्शन घेऊन ,काशीद बीच ,मुरुड जंजिरा किल्ला पाहून गाईड द्वारे त्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्यानंतर ऐतिहासिक महत्त्व असणारे महाडचे चवदार तळे विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. दुसरे दिवशी प्रतापगडाची माहिती व महत्व जाणून घेऊन, महाबळेश्वर ,वेण्णा लेक या पर्यटन स्थळाला भेट दिली त्यानंतर वाईच्या महागणपतीचे दर्शन घेऊन आनंदाने ही सहल १० तारखेला शनिवारी पहाटे ४ वाजता घेरडी शाळेवरती सुखरूप पोहोचली.

या सहलीसाठी संस्थेचे अध्यक्ष श्री.सोमा (आबा) मोटे, संस्थेचे सचिव श्री.राजेंद्र मोटे, प्रशालाचे मुख्याध्यापक श्री महेश पुकळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने सहल उत्साहात पार पडली.

# शिवणे माध्यमिक विद्यालयाचे चित्रकला ग्रेड परीक्षेत घवघवीत यश

शिवणे (वार्ताहर)- महाराष्ट्र राज्य कला संचालनालय मुंबई यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या चित्रकला ग्रेड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून परंपरेप्रमाणे याही वर्षी शिवणे माध्यमिक विद्यालयाने१००% निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.

यावर्षीच्या एलमेंटरी परीक्षेत - श्रेणीत ०२ विद्यार्थी ,इ श्रेणीत १६ विद्यार्थी व उ श्रेणीत १६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

इंटरमिजीएट परीक्षेत - श्रेणीत ११ विद्यार्थी,इ श्रेणीत १० विद्यार्थी तर उ श्रेणीत ०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्राचार्य विजयकुमार वाघमोडे यांनी प्रथम अभिनंदन केले.तसेच संस्था अध्यक्ष श्री.बबनराव जानकर, उपाध्यक्ष श्री.प्रकाशभाऊ वाघमोडे, सचिव डॉ.राजेंद्र जानकर आणि सर्व संचालक मंडळ यांनीही अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.


|| खुष खबर || || खुष खबर || || खुष खबर ||

आता सांगोल्यामध्ये जुने कपाट नविन करून मिळणार तेही घरी येऊन

अरमान अली स्टिल फर्निचर

प्रोप्रा. मुन्ना मिस्त्री (बार्शीकर)

आमचे येथे सर्व नामवंत कंपनीचे कपाट दुरुस्त करून, तसेच लॉक व काच बदलून मिळेल. तसेच सदरील कामे घरी येवून हि केली जातील...

(टिप आंतर मर्यादा ३० कि. मी. पर्यंत)

आमचा पत्ता

चिंचोली रोड, मोहिते डॉक्टर समोर, आनंदनगर, सांगोला

संपर्क: 7066289266

TATA POWER SOLAROOF

TATA

भारताची क्र. १ ची सोलर रूफटॉप कंपनी*

अधिकृत चॅनल पार्टनर: सनर्जी सोलर

संपर्क : 9022908009 / 9075929191 8009300996. मार्केट यार्ड समोर, पंढरपूर रोड, सांगोला

हे ऑन तर क्वालिटी लाइफलाँग

सांगोलकरांच्या सेवेस रूजू.....

सद्गुरु सुपर बाजार

एकदम स्वस्त आणि मस्त

निवडक व स्वच्छ किराणा बाजार मिळण्याचे एकमेव ठिकाण

घरपोच सेवा उपलब्ध..



मो.8830910641

पत्ता: ड्रीम सिटी समोर, एकतपुर रोड, सांगोला.